Peer Reviewed International Research Journal of Geography
**Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika**
ISSN : 0971-6785 {Impact Factor 2.561 (IIFS)} Vol. 33, No.1, Jan-Jun. 2016. pp 43 -51

# RESETTLEMENT & DEVELOPMENT OF MIGRATED DUE TO INDIRA SAGAR PROJECT :SPECIAL REFERENCE OF THE VILLEGE ITGAON

M. S. Gomase R. V. Dakare

***Abstract***

*Though the biggest water resources project's development is most beneficial to the agriculture, drinking water and to the industries, it affects badly to the life of the migrated people in the area. In all over the world, due to the biggest water project near about 4 to 8 crore population has been migrated (Scattered). According to the published report in the reference of 192 projects of world bank, during the period of 1989 to 1993 40 lakhs people have been migrated every year and on an average 300 big projects are being sanctioned every year.In only India 2.1 to 4.2 crore people have been migrated due to these water project (India Country Study 2000). In this figure the people are included whose land, homes has been the victims of this projects, dams, electriced houses.Flow rehabilitation, resettlement and migration are the major problems for the water project's victims but at the same time they have many issues to fight against like human rights, power, responsibilities, participation in the development and self-determination, confusion in the formation of resettlement, planning, options, legal processes and the different aspects of the values etc.There are nearabout 1821 big projects are (working) in all over Maharashtra. Among them India Sagar Project at Gosekhurd in Pavani Taluka, Dist. Bhandara is the great and ambitious project. The construction work of this project has been completed and it has been started to irrigate water in it. Till the date of 22nd of Nov. 2013 239 meter water has been irrigated and though village families migration and rehabilitation has been done, the development of the facilities and basic needs in the resettlement has not been done with this purpose this study has been done to examine what impact is there on the rehabilitated peoples economical and social life.*

**Key words –**Migration, Compensession, Resettlement, Development Planning

प्रस्तावना

उद्दिष्टये :—

संबंधित विषयाचा मुख्य उद्देश गोसेखुर्द प्रकल्पाच्या निर्मितीमूळे प्रभावित झालेल्या गावांचे पुर्वसाहतीकरण, त्यांचे विस्थापन, निवासीकरण आणि त्यांचा विकास व त्यांच्या समस्या संदर्भात चर्चा करणे आहे.

अध्ययन पद्धती :—

सदर अध्ययनासाठी गोसेखुर्द प्रकल्पामूळे विस्थापीत आणि पुनर्निवासीत वस्ती ''पागोरा'' या गावाला दि. ३१ ऑक्टोबर २०१५ ला भेट दिली. मूळ वस्ती इटगांव असून ती पूर्णपणे विस्थापीत झ्यालेली नाही. प्रश्नावली तयार करून जमीनीच्या नुकसान भरपाई संदर्भात आणि पूनर्वसाहतीच्या विकासा संदर्भात अनेक प्रश्न विचारून खरी माहिती गोळा करण्यात आली. संपूर्ण पुनर्वसन आणि त्यांचा विकास सरकारी नियमानुसार झाला की नाही किंवा होत आहे की नाही हे प्रश्नावलीच्या माध्यमातून आणि प्रत्यक्ष अवलोकनातून गोळा करून सदर अहवाल तयार करण्यात आला आहे. थोडक्यात सदर अध्ययनात मुलाखत पद्धतीचा अवलंब करण्यात आला. तसेच निरिक्षण आणि विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

मूळ संकल्पना :—

''विविध वसाहतीतील लोकांचे पुनर्वसन करतांना पुनर्वसित वसाहतीचे स्थान, वसाहतीत पायाभूत सोयींचा

विकास, शेतजमीन, नोकऱ्या व घरांचा मोबदला, स्वयंरोजगार निर्मितीसाठी उपाययोजना इत्यादी बाबतीत अनेक समस्या निर्माण होतात. बरेच वेळा पुनर्वसित लोक व सरकार यात संघर्ष निर्माण होतात. सरकारची ध्येय–धोरणे, निधीची उपलब्धता, शासनाची उदासिनता, प्रामाणिक, प्रयत्नांचा अभाव इ. विविध कारणांमुळे पुनर्वसाहतीच्या विकासात अनेक अडचणी निर्माण होतात.''

विस्थापन :–

विस्थापन म्हणजे विकास प्रतिमानाचा असा अर्थ की, ज्यात विकासाकरिता गंभिर विचार न करता बाबींची निवड केलेली असते. बहुतांश विस्थापन अनैच्छिक असतात. यात प्रभावित व विस्थापीत लोकांना प्रकल्पाची अतिशय अल्प प्रमाणात माहिती असते. या प्रकल्पांपासून त्यांना मिळणारे फायदे अतिशय अल्प प्रमाणात असतातच परंतु ते सुद्धा मिळण्यासाठी बराच कालावधी लागतो. यामध्ये लोकांना स्वत:च्या जमीनी कायमच्या गमवाव्या लागतात. जमीनीचा योग्य मोबदला मिळत नाही. विस्थापीत झालेल्या लोकांच्या विकासासाठी कोणत्याही योजना राबविल्या जात नाही. त्यामुळे गरीबी आणि बेरोजगारी सारख्या मोठ्या समस्या उद्भवतात. यातून सामाजिक विषमता निर्माण होण्याची भिती असते. प्रभावित लोकांना मिळणाऱ्या मोबदल्याचा विचार होणे अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या लोकांच्या शेतजमीनी प्रकल्पात गेल्या आहेत त्यांना पाहिजे त्या प्रमाणात योग्य मोबदला किंवा जमिनीच्या बदल्यात जमिन मिळाली पाहिजे, पण असे आढळत नाही. अनेकांच्या जमीनी प्रकल्प, नहर, विद्युत गृह, वसाहत आणि इतर कार्याखाली जातात. असे लोक स्वत:च्या मालमत्ता कायमच्या गमावतात. ज्या जागेवर त्याचा प्रभूत्त्व असते, जे लोक स्वत:ची शेती, घर गमावतात त्यांचा पुरेपूर विचार व्हायला पाहिजे. त्यांच्या विस्थापनासाठी आणि विकासासाठी शासनाच्या योजनांचा योग्य लाभ मिळायला हवा.

मोबदला :–

प्रभावित लोकांपैकी जे लोक व्यवसायात असतात त्यांचा व्यवसाय कायमचा बुडतो. उदा. शेतमजूर, सुतार, लोहार इत्यादींना योग्य मोबदला मिळायला हवा. विस्थापीत लोक सार्वजनिक संसाधन आणि संपत्ती प्रकल्पामूळे गमावतात. ही संपत्ती पून्हा निर्माण करणे कठीण असते. उदा. जंगले, कुरणे, इ. याकरिता योग्य योजना असायला पाहिजे.

पुनर्वसाहतीकरण व पुनर्निवासीकरण :–

पुनर्वसन कार्यक्रम हा पुनर्वसित लोकांचा आर्थिक सामाजिक बाबींचा विचार करता तसेच नैसर्गिक स्थान लक्षात न घेता आखण्यात येतो. त्यामूळे प्रभावित लोकांच्या मनात न्युनगंडाची भावना निर्माण होते. यात मुख्य बाब म्हणजे आर्थिक जोखीम असते. जी प्रभावीत लोकांपासून हीराऊन घेतली असते. उदा. निवास गृह, उत्पन्नाचे साधन, पडीत जमीन, सार्वजनिक संसाधन जसे जंगल, कुरणे, खेळाचे मैदान, पिण्याचे पाणी इ. त्यासाठी पुनर्वसाहतीकरण आणि विकासासाठी Cernea नी खालील मुद्दे सांगितले आहेत, त्यासाठी त्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

१. पुनर्वसानासाठी आवश्यक रक्कमेची तरतुद. २. संस्थांचा कमकुवतपणा (देखरेख संस्था) वर मात.
३. प्रभावी यांत्रिकीकरण. ४. प्रभावित लोकांचा सहभाग घेणे.
५. बहुमोल संपत्ती, रोजगार, उदारीकरण, भूक, सांस्कृतिक विखरण इत्यादींवर योग्य योजना आखणे.
६. स्त्रिया व लहान मुलांकरिता योजना आखणे. ७. अस्थायी घरे निर्माण करणे.
८. भूमीच्या बदल्यात भूमी योजना राबविणे. ९.पुनर्निवासित लोकांची सामाजिक–परिस्थितीची जाणीव ठेवणे.
१०. समाजाचे तुकडीकरण होऊ नये, सामाजिक श्रृंखला जुळून राहावी, परंपरागत आधारपद्धती कायम राहावी अशा योजना आखणे. ११. जनजातीय लोकांवर घाव घालणाऱ्या योजना टाळाव्या. १२. आवश्यक सुविधा जशा दवाखाने, शाळा, बँकांची व्यवस्था करावी. १३. कायदेशीर आराखडा तयार करण्यात यावा. १४. कायदेशीर नियमांची अंमलबजावणी व्हावी. १५. भूमीहीन कडून भूमीआधारित पुनर्वसन १६. बेरोजगारी कडून रोजगाराकडे १७. अन्न दुर्भीक्षाकडून सुरक्षित आहाराकडे १८. बेघर कडून स्वत:च्या घराकडे. १९. वाढत्या मृत्यूदराकडून सुदृढ स्वास्थ्याकडे,

इत्यादी योजना पुनर्वसित लोकांसाठी राबविल्या जातात.

पुनर्वसाहत विकास

गोसेखुर्द प्रकल्पाची पार्श्वभूमी :–

भंडारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात वैनगंगा नदीवर 'गोसेखुर्द' या गावाजवळ 'इंदिरा सागर' प्रकल्प असून त्याचा अक्षांश–रेखांशीय विस्तार २००२१'५५'' उत्तर आणि ७९०३७'४०'' पूर्व असा आहे. हा प्रकल्प भंडारा, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्याकरिता अतिशय महत्त्वाचा असून फक्त भंडारा जिल्ह्यातील नैसर्गिक संसाधनावर व सांस्कृतिक घटकांवर त्याचा प्रतिकुल प्रभाव पडलेला आहे. या प्रकल्पाचे क्षेत्रफळ २२२५८ हेक्टर असून जलसाठवणूक क्षमता ११४६ दशलक्ष घन मिटर आहे. हा प्रकल्प मुख्यत: नागपूर जिल्ह्यातील उद्योगांना व शेतीला, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतीला आणि भंडारा जिल्ह्यातील अल्प प्रमाणात शेतीला फायद्याचा आहे. या प्रकल्पामूळे भंडारा जिल्ह्यातील भूमीगत पाण्याचा जलस्तर वाढेल तसेच वैनगंगा नदीच्या परिसरात मासेमारीला वाव मिळेल. हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आणि फायद्याचा असला तरी भंडारा जिल्ह्यातील नैसर्गिक साधन संपत्ती आणि लोकांच्या सांस्कृतिक जीवनावर त्यांचा विपरित प्रभाव पडलेला आहे. भंडारा जिल्ह्यातील प्रभावित भागातील शेती, लोकांचे राहण्याचे घर, त्यांची साधन संपदा, उद्योग, व्यवसाय, आर्थिक मिळकतीचे साधन कायमचे गमावले आहेत. त्याकरिता इटगाव या मूळ 'पागोरा' येथे पुनर्वसीत वसाहतीतील ७८ टक्के शेतकरी १८ टक्के मजूर ०४ टक्के व्यावसायिक लोकांचे सर्वेक्षण करून प्रस्तुत अहवाल तयार करण्यात आला आहे.

मूळ वसाहत पागोरा व पुनर्वसाहत ईटगांव चे स्थान



पुनर्वसीत कुटूंबाचे प्रमाण :—

| वर्ष | टक्केवारी |
|---|---|
| २००९ | ०६ |
| २०१० | ०२ |
| २०११ | ४२ |
| २०१२ | ३४ |
| २०१३ | १६ |

गोसेखुर्द प्रकल्पाचे काम सन १९८८ पासून सुरू झाले आणि जवळ जवळ २० वर्षात ते पूर्ण झाले. काम पूर्ण होताच जुन्या प्रभावित वसाहतींना पुनर्वसाहतीमध्ये स्थलांतरीत/विस्थापीत करण्याचे काम झपाट्याने होऊ लागले. सर्वेक्षणावरून असे आढळले आहे की, एकुण पुनर्वसनापैकी २००९ वर्षात ०६ टक्के कुटूंब स्थलांतरीत झाली, २०१० वर्षात ०२ टक्के कुटूंबाचे स्थलांतरण झाले तर सर्वात जास्त स्थलांतरण २०११ आणि २०१२ वर्षात अनुक्रमे ४२ टक्के व ३४ टक्के झाले असून उर्वरित १६ टक्के कुटूंबाचे स्थलांतरण २०१३ मध्ये झाले आहे.

प्रकल्प निर्मितीत प्रभावित लोकांचा सहभाग :—

प्रकल्प तयार करतांना परिसरातील प्रभावित लोकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यांना विश्वासात घेणे महत्त्वाचे असते.

| सहभागाचे स्वरूप | टक्केवारी |
|---|---|
| वरवरचा सहभाग | ४६ |
| त्यांना कमी लेखले गेले | ०८ |
| योग्य रीतीने हाताळले | ३६ |
| प्रत्यक्ष सहभाग घेतले | १० |

प्रभावित लोकांचा सदर प्रकल्प निर्मितीमध्ये सहभाग वेगवेगळा आढळतो. सर्वेक्षणावरून स्पष्ट होते की, ४६ टक्के लोकांचा प्रकल्प निर्मितीमध्ये वरवर सहभाग होता. तर ०८ टक्के लोकांचे असे मत आहे की, त्यांना प्रकल्प निर्मितीमध्ये कमी लेखले गेले. त्यांना पाहिजे त्या प्रमाणात विश्वासात घेतले नाही. म्हणजेच ५० टक्के च्या वर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असलेला आढळून येत नाही. तर ३६ टक्के लोकांच्या मते त्यांना योग्य रितीने हाताळले आहे. तर १० टक्के लोकांचा प्रकल्प निर्मितीमध्ये प्रत्यक्ष सहभाग होता.

धरणाचा प्रभावित लोकांवर आर्थिक, सांस्कृतिक व शारीरिक प्रभाव :—

गोसेखुर्द धरणाचा नैसर्गिक पर्यावरण आणि संसाधनावर परिणाम झाला आहे, सोबतच प्रभावित लोकांवर आर्थिक, सांस्कृतिक व शारीरिक प्रभाव पडलेला आहे. ९० टक्के लोकावर विपरीत प्रभाव झालेला आढळतो. अनेक लोकांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागले. सामाजिक व सांस्कृतिक समस्या पुनर्वसीत कुटूंबामध्ये किंवा गावांमध्ये भेडसावत आहेत. सर्वेक्षणावरून स्पष्ट होते की, ५२ टक्के कुटूंबांना रोजगाराची समस्या भेडसावत आहे. काही लोकांनी मिळालेला मोबदल्याचा योग्य रितीने वापर केला. बरेच त्यात अपयशी ठरले आणि ४२ टक्के लोकांनी व्यर्थ कार्यात मिळालेला पैसा खर्च केला. त्यामुळे ४२ टक्के लोकांना संपत्ती विहीनतेची समस्या भेडसावत आहे. अनेकांना जुगार आणि दारू पिण्याचे व्यसन लागले. त्यामुळे १९ टक्के लोकांवर कर्जबाजारीपणाला तोंड द्यावे लागले आहे

| विपरित प्रभाव | टक्केवारी |
|---|---|
| संपत्ती विहीनता | ४२ |
| बेरोजगारी | ५२ |
| कर्जबाजारीपणा | ३८ |

पुनर्वसीत वसाहतीमधील स्त्रिया आणि लहान मुलांवरही विपरीत प्रभाव पडलेला आहे. लहान मुलांच्या (काही मुलांच्या) शाळा सुटल्या, काही स्त्रियांना, घरगुती कामाशिवाय इतर कोणतीही कामे उरली नाहीत. तर काही स्त्रियांना कामासाठी दुसऱ्या गावांमध्ये जावे लागते. बऱ्याच लोकांना मजूरी मिळत नाही किंवा पाहिजे त्या प्रमाणात मजूरीचे दर मिळत नाही.

वसाहतीसाठी जागेची निवड :—

सुरूवातीला अनेक पुनर्वसाहतीमध्ये अस्थायी/हंगामी घरांची निर्मिती केली. नंतर लोकांना घर बांधणीसाठी जमीनीचे पट्टे मिळाल्यावर जवळ जवळ ८० टक्के ते ९० टक्के लोकांनी पक्की घरे तयार केली.

परंतु पुनर्वसाहतीची जागा निवडतांना उदरनिर्वाहक साधनांना अग्रक्रम न देता फक्त लोकांच्या विस्थापणालाच अग्रक्रम दिला आहे. सर्वेक्षणावरून असे स्पष्ट झाले आहे की, ८२ टक्के लोकांचा असा समझ आहे की, शासनाने फक्त विस्थापनालाच अग्रक्रम दिला आहे. तर फक्त १८ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की, उदरनिर्वाहक साधनांचा सुद्धा विचार करण्यात आला आहे परंतु पुनर्वसाहतींमध्ये उदरनिर्वाहाचे कोणतेही साधने उपलब्ध नाहीत.

मूळ व नवीन गावातील घरांची तुलना :—

जुन्या मूळ गावांमध्ये वेगवेगळया आकाराची व वेगवेगळया साधनांची बनलेली होती. परंतु नवीन पूनर्वसीत वसाहतीमध्ये पक्की आणि विटा—सिमेंटची घरे आढळतात. जवळ जवळ ७५ टक्के लोकांच्या घराचा आकार त्यांच्या मूळ गावातील घरापेक्षा मोठा आहे. प्रत्येकांच्या घरी जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध आहे. घरासाठी मिळालेल्या जागेचा आकारही मोठा आहे.

स्वयंरोजगार व कृषीभूमी विषयी शासनाचे धोरण :—

गोसे प्रकल्पांतर्गत कालवे व ऑफिसेस मध्ये जी शेती भूमी (शेतकऱ्यांची) गेली त्या मोबदल्यात पुनर्वसीतांना शेतीच्या बदल्यात शेती देण्याविषयी सरकारचे किंवा प्रमुख संस्थांचे धोरण उदासिन स्वरूपाचे आहे. कोणत्याही प्रभावित शेतकऱ्यांना कृषी—भूमीच्या मोबदल्यात कृषी—भूमी मिळाली नाही.

त्याचप्रमाणे ज्या कुटूंबाचे रोजगार नष्ट झाले अशा लोकांना पुनर्वसीत ठिकाणी रोजगारासाठी कोणतीही भूमी पुरवण्यात आली नाही. या उलट पुनर्वसीत वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारचा Non Land Based उदरनिर्वाहक नितीचा वापर केला गेला नाही. रोजगार निर्माण करण्यासाठी कौशल्य किंवा क्षमता निर्माण होण्यासाठी कोणत्याच प्रकारचे प्रयत्न केले गेले नाही.

पुनर्वसनामूळे निर्माण झालेल्या समस्या :—

पुनर्वसनामुळे अनेक लोकांच्या शेतजमीनी कायमच्या गेल्या, बेरोजगारी, व्यसन, इ. गोष्टींमध्ये वाढ झाली. त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना समोरे जावे लागते. उदा. मानसिक, रोगनिदानात्मक. जवळ जवळ ८२ टक्के कुटूंबांना मानसिक समस्यांना, ३० टक्के लोकांना रोगनिदानात्मक तर १० टक्के लोकांना दारूच्या व्यसनाचा शरीरावर दुष्परिणाम विषयक समस्यांना सामोरे जावे लागले आहे.

पुनर्वसीत वसाहतीत उपलब्ध मूलभूत सोयी :—

पुनर्वसीत वसाहतीत आधुनिक योजनांच्या मार्फत अनेक सुविधा पुरविल्या आहेत. उदा. रस्ते, विद्युत, पिण्याचे

पाणी, शाळा, अंगणवाडी, समाज मंदिर, देऊळ इत्यादी अनेक गावांमध्ये उपयोग्य सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असल्या तरी दवाखाने, बँक, खेळाचे मैदान, बगिचा, सहकारी संस्था, बाजार व रोजगार प्रशिक्षण इत्यादी सुविधा व सोयी वसाहतीमध्ये आढळत नाहीत. पुनर्वसीत वसाहतीमध्ये विस्थापीत झाल्यानंतर जवळ जवळ ७० टक्के कुटूंबाच्या गरजांमध्ये वाढ झाली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पूनर्वसाहत विकासासाठी निधी विषयी मत :—

प्रकल्पाचे काम सुरू होते त्यावेळी पुनर्वसाहतीच्या विकासाचा काम अतिशय संथ गतीने होता. अशा वेळी जवळ जवळ १०० टक्के लोकांना असे वाटप होते की, पुनर्वसाहीत विकासासाठी शासनाने अपुऱ्या निधीची तरतुद केली आहे. त्याचप्रमाणे विकासासाठी विविध संस्थांचा कमकुवतपणा, त्यांची क्षमता व सातत्याचा अभाव इत्यादी गोष्टीही १०० टक्के जबाबदार आहेत. एकंदरित प्रभावी पुनर्वसनासाठी शासकीय धोरण, आंतरराष्ट्रीय संस्थांचे धोरण, कायदेशीर साधने व प्रभावी यंत्रणा इत्यादी सर्व कुचकामी ठरल्या आहेत.

नुकसान भरपाई

मूळ जमीनीपैकी अधिग्रहित जमीनीचे प्रमाण :—

सर्वसाधारणपणे सर्वेक्षणात असे स्पष्ट झाले आहे की, गोसेखुर्द प्रकल्प जास्तीत जास्त जमीन प्रकल्पांतर्गत गेली आहे. फार अल्प प्रमाणात पुनर्वसीत लोकांची जमीन कालवे व इतर कार्यात गेली आहे. पुनर्वसीत शेतकऱ्यांच्या मूळ जमिनीचे जे प्रमाण होते त्यापैकी जवळ जवळ ९० ते ९५ टक्के पुनर्वसीत शेतकऱ्यांच्या १०० टक्के जमीनी प्रकल्पात गेल्या आहेत.

मिळालेल्या जमिनीच्या मोबदल्याचे प्रमाण आणि स्वरूप :—

सर्वेक्षणावरून असे स्पष्ट होते की, गोसेखुर्द प्रकल्पात ज्या शेतकऱ्यांच्या शेत जमिनी गेल्या आहेत त्यांना अजूनही १०० टक्के जमिनीचा मोबदला मिळाला नाही. शेतकऱ्यांना अनेक टप्प्यांमध्ये जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे. पुढील आकडेवारीवरून असे लक्षात येते की, १०० टक्के मोबदला मिळालेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७१.७९ टक्के आहे.

| मिळालेल्या मोबदल्याचे प्रमाण | शेतकऱ्याचे प्रमाण |
|---|---|
| ० टक्के | ५.१२ टक्के |
| २५ टक्के | २.३६ टक्के |
| ५० टक्के | १७.९५ टक्के |
| ७५ टक्के | २.५६ टक्के |
| १०० टक्के | ७१.७९ टक्के |

तर ७५ टक्के मोबदला (कृषी भूमीचा) मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २.५६ टक्के आहे. ५० टक्के मोबदला जवळ जवळ १८ टक्के शेतकऱ्यांना आणि फक्त २५ टक्के मोबदला मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २.३६ टक्के असून जवळ जवळ ५ टक्के शेतकऱ्यांना अजुनपर्यंत कोणत्याच प्रकारचा मोबदला मिळाला नसल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. मिळालेल्या मोबदल्याचा दर वेगवेगळा आहे. कोरडवाहू जमीनीचा दर एकरी ८०,००० रूपये आणि ओलीताखालील जमिनीचा दर एकरी १,००,००० रूपये वितरीत करण्यात आला आहे. मिळालेल्या या मोबदल्यात फार कमी शेतकरी समाधानी असलेले आढळतात. त्यांचे प्रमाण जवळ जवळ ५ टक्के आहे. तर ९५ टक्के शेतकरी मिळालेल्या मोबदल्यात समाधानी नाहीत.

मजूर कारागीर व अतिक्रमनधारकांची नुकसान भरपाई :—

या व्यतिरिक्त जमिनींशिवाय शेत कसणाऱ्या मजूर कारागीर आणि अतिक्रमनधारक यांना कोणत्याही प्रकारचा

मोबदला मिळालेला नाही. त्याचप्रमाणे गरीब लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन, उदा. कुरणे, जंगले, मासेमारी यांसारख्या साधारण आणि सामाजिक साधने कायमचे हिरावून घेतले गेले आहे. परंतु त्यांचा कोणत्याही प्रकारचा मोबदला प्रभावित लोकांना मिळाला नाही.

प्लॉट व घराचा मोबदला :—

शेती प्रमाणेच ज्या ज्या व्यक्तीचे घर प्रकल्पात गेले आहे त्या सर्वांना प्लॉटची रक्कम आणि पुनर्वसाहतीच्या विकासासाठी त्यांना नवीन घर तयार करण्यासाठी जवळ जवळ पुरेसा मोबदला मिळाला आहे. मिळालेल्या मोबदल्यात ८० टक्के लोक समाधानी आहेत. काही कारणास्तव २० टक्के लोक असमाधानी आहेत.

| रूपये (हजार) | कुटूंब संख्येचे प्रमाण टक्केवारी |
|---|---|
| ५० ह. पेक्षा कमी | २२ टक्के |
| ५० ह — १ लाख | ५६ टक्के |
| १ — १.५० लाख | ०८ टक्के |
| १.५० — २ लाख | १० टक्के |
| २ — ३ लाख | ०२ टक्के |
| ३ — ४ लाख | ०२ टक्के |
| एकूण | १०० टक्के |

पुनर्वसाहतीमध्ये नवीन घर बनविण्यासाठी मिळालेला मोबदला वेगवेगळा आहे. सर्वात जास्त म्हणजे ५६ टक्के लोकांना ५० हजार ते १ लाख रूपये मोबदला मिळाला आहे. तर सर्वात कमी लोकांना म्हणजे प्रत्येकी १—२ टक्के लोकांना अनुक्रमे २—३ लाख आणि ३—४ लाख मोबदला मिळाला आहे. २२ टक्के लोकांना ५० हजार पेक्षा कमी, ०८ टक्के लोकांना १ ते १.५० लाख आणि १० टक्के लोकांना १.५० ते २ लाख मोबदला मिळाला आहे. या मोबदल्याचा दर ७० रू. प्रती फुट असा होता.

मिळालेल्या नुकसान भरपाईचा कालावधी :—

प्रभावित लोकांना शेतजमिनीचा मोबदला एकाच वेळी आणि सर्वांना मिळाला नाही. भूमी अधिग्रहणाच्या १ वर्षानंतर पुढच्या १० वर्षापर्यंत नुकसान भरपाई वेगवेगळया प्रमाणात मिळाली आहे. जवळ जवळ ५० ते ६० टक्के प्रभावित शेतकऱ्यांना १ ते २ वर्षात नुकसान भरपाई मिळाली आहे. ३ वर्षानंतर १२ टक्के आणि ५ वर्षात १४ टक्के शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. ६ वर्षानंतर १० टक्के आणि उर्वरित ३ टक्के शेतकऱ्यांना १० वर्षानंतर नुकसान भरपाई मिळाली आहे. असे असले तरी अल्प प्रमाणात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यास आहे.

| मोबदला मिळण्याचा कालावधी (वर्षानंतर) | शेतकरी (टक्केवारी) |
|---|---|
| १ | ४८ |
| २ | १० |
| ३ | १२ |
| ५ | १४ |
| ६ | १० |
| १० | ०६ |

मिळालेल्या नुकसान भरपाईचा विनियोग :—

अनेकांनी मिळालेली नुकसान भरपाईची रक्कम जुआ व दारूमध्ये मोठया प्रमाणात खर्च केला. तर अनेकांनी मिळाले घर बांधणी, नवीन शेतजमीन विकत घेणे आणि काही शेतकऱ्यांनी रोजगारासाठी खर्च केली.जवळ जवळ ६० ते ७५ टक्के लोकांनी मिळालेल्या पैशात नवीन घर तयार केले. २५ ते ३० टक्के लोकांनी नवीन शेतजमीन विकत घेण्यास खर्च केली.

तर जवळ जवळ ०५ टक्के लोकांनी रोजगार मिळविण्यात खर्च केले कारण ज्यांचा रोजगार बुडाला त्यांना नवीन रोजगारासाठी वेगळी रक्कम शासनाने दिली नाही.

जलसाठयात मासेमारीची योजना :—

प्रकल्पाच्या जलसाठयात मासेमारीसाठी मोठा पर्याय उपलब्ध आहे. जलसाठयात मासेमारीसाठी काही प्रमाणात विनामुल्य, भाडेतत्त्वावर तर काही प्रमाणात सहकारी संस्था तत्त्वावर पर्याय खुले आहेत.

पूर मैदानी भागात शेतीची योजना :—

धरणाची पातळी कमी झाल्यावर आजूबाजूच्या पूर मैदानाच्या भागात सिंचन करून भाजीपाला व इतर पिके काढण्याची मुभा नाही.

प्रकल्पग्रस्तांना नोकरीची योजना :—

शासनाद्वारे धरणग्रस्तांना योग्यतेनुसार नोकरी देण्याची हमी घेतली होती. परंतु आतापर्यंत फक्त १० टक्के प्रभावित लोकांनाच याचा फायदा झाला. त्यांना फक्त लिपीक आणि शिपाई पदाच्या नोकऱ्यांवर सवलती देण्यात आल्या आहेत. परंतु अजूनपर्यंत ज्यांना नोकरी दिली नाही त्यांना कोणताही मोबदला दिला गेला नाही. त्यामुळे प्रभावित आणि पुनर्वसीत लोक शासनाच्या नोकरीविषयक धोरणावर १०० टक्के असमाधानी आहेत. प्रभावित लोकांपैकी जवळ जवळ ५० टक्के लोकांचे असे मत आहे की, ज्यांना अजूनपर्यंत नोकरी मिळाली नाही त्यांना नोकरी ऐवजी रूपये २,९०,०००/— मोबदला म्हणून देण्यात यावे. तर २८ टक्के लोकांना असे वाटते की, त्यांना नोकरी ऐवजी रोजगार देण्यात यावा. याउलट १६ टक्के लोकांची अशी इच्छा आहे की, जर शासन देत नसेल तर त्याऐवजी त्यांना शेतजमीनी द्यावे.

सारांश व उपाययोजना

सारांश :—

पागोरा या ठिकाणी पुनर्वसित झालेल्या इटगांव या मुळ वस्तीचे सर्वेक्षण केले असता असे दिसून येते की, या वसाहतीमध्ये ७८ टक्के शेतकरी, १८ टक्के मजूर व ०४ टक्के व्यावसायिक लोकांचे वास्तव्य आहे. गोसेखुर्द प्रकल्पाचे काम सन १९८३ पासून सुरू झाले असून जुन्या वसाहतींना विस्थापीत करण्याचे काम झपाटयाने होऊ लागले. यामध्ये इटगांव या वसाहतीचे स्थलांतरण सुद्धा पागोरा या ठिकाणी झाले असून ते क्रमाक्रमाने म्हणजेच स्वत: किंवा बळजबरीने स्थलांतरीत करण्यात आले.सर्वेक्षणावरून असे आढळून येते की, एकूण पुनर्वसनापैकी २००९ वर्षात ०६ टक्के कुटूंब स्थलांतरीत झाली. २०१० वर्षात ०२ टक्के तर २०११—१२ या वर्षात कुटूंबाचे मोठया प्रमाणात स्थलांतरण झाले असून त्याचे प्रमाण ४२ टक्के, ३४ टक्के इतके होते आणि उरलेल्या १६ टक्के कुटूंबाचे स्थलांतरण २०१३ मध्ये झालेले आहे. प्रकल्प तयार करतांना वेगवेगळया लोकांचा वेगवेगळया प्रमाणात असलेला सहभाग सर्वेक्षणावरून दिसून आला. यामध्ये ४६ टक्के लोकांचा वरवरचा तर ५० टक्के लोकांचा सहभाग असलेला आढळून येत नाही. तर १० टक्के लोकांच्या मते ते योग्य असल्याने त्याचा प्रत्यक्ष सहभाग दिसून आला. पागोरा या ठिकाणाची निवड करतांना उदरनिर्वाहक साधनांना अग्रक्रम न देता फक्त लोकांच्या विस्थापनाचा विचार शासनाने केलेला दिसून येतो. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध नाहीत. तसेच या ठिकाणी झालेल्या विस्थापित लोकांची घरे मूळ इटगांव येथील घरांपेक्षा आकाराने मोठे असून पक्क्या विटांनी बांधलेली आहेत हे निरीक्षणावरून दिसून येते.पुनर्वसन विस्थापित पागोरा येथील लोकांना त्यांच्या केलेल्या पुनर्वसनामूळे त्याच्या सामाजिक आर्थिक शारीरिक, धार्मिक कार्यावर मोठया प्रमाणात प्रभाव पडला. तसेच मुख्य म्हणजे बेरोजगारी, व्यसन, जुगार यांच्यावर सुद्धा प्रभाव पडला. या ठिकाणी लोक कर्जबाजारी झालेले आढळून आले. तसेच अनेक सुविधा, योजनांचा अभाव दिसून आला. तसेच शिक्षणासाठी मूलांना बाहेरगावी जावे लागते.

उपाययोजना :—

पुनर्वसित पागोरा या गावाचे सर्वेक्षण केले असता त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागे. त्यामुळे त्यांचा आर्थिक सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी काही उपाययोजना केल्या जाऊ शकतात.

१.पुनर्वसित लोकांच्या उदरनिर्वाहाचा विचार करता त्यांना उदरनिर्वाहक साधनांची उपलब्धता करून देऊन त्यांना योग्य काम धंदे मिळवून देणे.

२.पुनर्वसित लोकांना त्याचा योग्य प्रमाणात मोबदला मिळावा यासाठी विविध योजनेतून आर्थिक सहाय्य करावे.

३.शेतकऱ्यांना मिळालेला पैसा रोजगारासाठी खर्च करावा.

४.प्रकल्पाचा जलसाठा मासेमारीसाठी उपयुक्त मोठा पर्याय उपलब्ध असल्यामुळे जलसाठयामध्ये मासेमारीसाठी विनामुल्य/भाडेतत्त्वावर तसेच सहकारी संस्था तत्त्वावर संधी निर्माण करून देणे.

५.शिक्षणाची योग्य सोय निर्माण करून देणे व नोकरीत संधी उपलब्ध करूण देणे.

संदर्भ :

1. Achmad, Hisyam, 1991. The Social Costs of Resettlement: A Case Study Five Years After the Inundation of the Saguling and Cirata Dam Areas in West Java. Jakarta, Indonesia.
2. Ackermann, W. C., G. F. White, and E. B. Worthington (eds.), 1973. Man-Made Lakes: Their Problems and Environmental Effects. Washington D.C.: American Geophysical Union, Monograph No. 17, 1973.
3. Alvares, Claude, and Ramesh Billorey, 1987. "Damming the Narmada: The Politics Behind the Destruction." The Ecologist, 17(2/3), 1987.
4. Asian Development Bank, "Staff Instructions on Certain Policy/Administrative Issues — Involuntary Resettlement," 15 February 1994.
5. Asian Development Bank, 1991. Guidelines for Social Analysis of Development Projects. Manila, Philippines: Asian Development Bank, 1991.
6. Asian Development Bank, Guidelines for Social Analysis of Development Projects, Appendix 6, Manila, June 1991. These Guidelines have been superseded by the Guidelines for Incorporation of Social Dimensions in Bank Operations, issued in October 1993.
7. Barth, Fredrik and T. R. Williams, 1994. Initial Resettlement Planning and Activity (1992-1994) in a Large Scale Hydropower Process: The Ertan Dam in Southwest China. Draft manuscript, processed.
8. Bartolome, Leopoldo, 1984. "Forced Resettlement and the Survival Systems of the Urban Poor." Ethnology, 23 (3), 1984.
9. Billson, Janet Mancini, 1990. "Opportunity or Tragedy: The Impact of Canadian Resettlement Policy on Inuit Families." American Review of Canadian Studies, 20 (2), 1990.
10. Cernea, Michael M, 1990. "Internal Refugee Flows and Development-Induced Population Displacement." Journal of Refugee Studies, 3 (4), 1990: 320-339. World Bank Reprint Series:No. 462, Washington, D.C. 1990.
11. OECD, Development Assistance Committee, Guidelines for Aid Agencies on Involuntary Displacement and Resettlement in Development Projects, OECD/GD(91)201, Paris, 1991.
12. World Bank, Environment Department, Resettlement and Development: The Bankwide Review of Projects involving Involuntary Resettlement, Washington, D.C., 8 April 1994.

***Dr. Madhukar S. Gomase**
Late P.M. Arts & Comm.
College, Warthi (Bhandara)

****Ku. Ranjana V. Dakare**
( Research Student )
Bhandara.